

मुंबई : आरेच्या जंगलात कालपर्यंत रोखले गेलेले मेट्रो कारशेड उभारणे सुरू झाले आणि कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ चे पहिले चार डबे मुंबईत बुधवारी पहाटे दाखलही झाले. सारीपूत नगर आणि मरोळ नाका दरम्यान तीन किलोमीटरच्या भुयारी मार्गातील चाचणीसाठी हे डबे वापरले जाणार आहेत.